# महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
## राहुरी जि.अहमदनगर

Ph.No.(02426)243374 Email.-comptroller,mpkv@gov.in/ac2mpkv@gmail.com.

जा.क्र./म.फु.कृ.वि/नियंत्रक/लेखा-२/ ०१ / २०१९ दिनांक- ०२ / ०४ / २०१९

## परिपत्रक

विषयः- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये प्रशासकीय मंजुरी मिळालेले प्रस्ताव सन २०१९-२० मध्ये पुनश्च मंजुरीस्तव सादर न करणेबाबत ... स्थायी अग्रीमांसाठी पुनश्च मंजूरी न घेणेबाबत...

उपरोक्त विषयान्वये या विद्यापीठातील सर्व योजना प्रमुख /कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ महसुली उत्पन्न/फिरते निधी/भा.कृ.अ.प. विद्यापीठ बळकटीकरण योजना (ICAR-SAU) /दुरुस्ती व देखभाल इ. लेखाशिर्षाअंतर्गत / निधींमधून सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये मा कुलगूरु महोदयांनी प्रशासकीय मान्यता दिलेली असताना, सन २०१८-१९ मध्ये वर्षाअखेरीस त्या मंजूरीन्वये खर्चाची कार्यवाही पूर्ण न झाल्यामुळे संबंधीत कार्यालये सदर प्रस्ताव पुनश्चः सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये मा-कुलगुरू महोदयांच्या मंजूरीस्तव नव्याने सादर करतात व त्यामुळे मंजूरीची व कामकाजाची पुनरावृत्ती होते.

(अ) या अनुषंगाने मा.कुलगुरु यांचे मान्यतेचे कळविण्यात येते की, लेखायंहीता नियम ६.५ नुसार रु.३.०० लाखांपर्यंतच्या खर्चासाठी सन २०१८-१९ मध्ये प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामांची प्रशासकीय मान्यता लेखासंहिता नियम ६.१२ नुसार सन २०१९-२० अखेरपर्यंत खालील अटीवर ग्राहय राहील.

१. मागील आर्थिक वर्षामध्ये मंजूर आर्थिक तरतूद/अंदाजपत्रकीय तरतूद/मंजूर वार्षिक नियतव्यय व्यपगत झाला असून प्रस्तावित कामांसाठी निधीची तरतूद सन २०१९-२० अंदाजपत्रकीय मागणीद्वारे नव्याने करण्यात यावी.

२. विद्यापीठ महसूली उत्पन्न, फिरते निधी, योजनेतर देखभाल दुरुस्ती निधी यांमधील सन २०१८-१९ मध्ये देण्यात आलेल्या कामांच्या प्रशासकिय मान्यता ( सन २०१९-२० मधील नवीन आर्थिक तरतूद करण्यास अधिन राहून ) सन २०१९-२० साठी लागू राहतील.

३. यामध्ये GoI Funded, ICAR, RKVY व तत्सम राज्य शासन अथवा केंद्र शासन अनुदानीत त्याच कामांचा सामावेश असेल, ज्या कामांसाठी सन २०१८-१९ मध्ये प्राप्त अनुदान आवश्यकतेनूसार सन २०१९-२० मध्ये खर्च करण्यास्तव Revalidation प्राप्त झालेले आहे.

कृ.मा.प

(ब) रु.३.०० लाखावरील खर्चांसाठी यथास्थिती मा.राज्यपरिषद अथवा मा.भा.कृ.अ.प. अथवा अन्य सक्षम प्राधिकारी यांच्या प्रशासकीय मान्यतेन्वये कार्यवाही करावी.

(क) या पुर्वी मंजूर असलेले सर्व स्थायी अग्रीम यथास्थिती कार्यरत राहतील. त्यामुळे त्यांचे पूर्वमान्यतेस्तव नवीन आर्थिक वर्षात प्रस्तावित करण्याची आवश्यकता नाही.

वरील सुचना विचारात घेऊन मागील प्रशासकीय मान्यतेच्या नस्त्या पुर्नजिवीत करण्यासाठी सादर करण्यात येऊ नयेत आणि सन २०१९-२० मध्ये आवश्यक निधीसाठी अंदाजपत्रकीय मागणी लागलीच नोंदवावी. अंदाजपत्रकीय मागण्या संकलीत करण्यास्तव स्वतंत्र परिपत्रक जारी करण्यात येत आहे.

नियंत्रक
मफुकृवि,राहुरी.

**प्रतिलिपी खालील अधिका-यांच्या माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः-**

१. मा.संचालक, विस्तार शिक्षण/संशोधन, मफुकृवि, राहुरी.
२. मा.अधिष्ठाता (कृषि), तथा संचालक शिक्षण, मफुकृवि, राहुरी.
३. कुलसचिव/विद्यापीठ अभियंता/विद्यापीठ ग्रंथपाल, मफुकृवि, राहुरी.
४. सहयोगी अधिष्ठाता व सहयोगी संशोधन संचालक (सर्व)
५. प्रकल्प अधिकारी, कृ.म. मुक्ताईनगर/हळगांव.
६. विदयार्थी कल्याण अधिकारी, मफुकृवि, राहुरी.
७. सर्व विभागप्रमुख/योजनाप्रमुख /कार्यालय प्रमुख, मफुकृवि, राहुरी.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मफुकृवि, राहुरी/ पुणे/धुळे/कोल्हापूर.
९. सहा.नियंत्रक-१ तथा अतिरीक्त अधिदान व लेखा अधिकारी, मफुकृवि, राहुरी.
१०. मा.कुलगुरू महोदय/कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक मफुकृवि, राहुरी.